# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था )

२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प पुणे -४११ ००१. | Website : http//:barti.maharashtra.gov.in

**बँक, रेल्वे, एल.आय.सी. इत्यादी लिपीक वर्गीय व तत्सम पदाच्या स्पर्धा परिक्षेच्या पूर्वतयारी करिता अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून नि:शुल्क अनिवासी प्रशिक्षणाकरीता (कोचिंग) चाळणी परीक्षा स्थगित करण्याबाबत**

## सुधारीत जाहिरात

महाराष्ट्र राज्यात कोरोना (COVID-१९) या विषाणूंचा संसर्ग झालेले रुग्ण आढळून आल्याने सदर विषाणूंपासून होणाऱ्या आजाराचा जास्त प्रादूर्भाव रोखण्याकरीता महाराष्ट्र शासनाकडून युध्द पातळीवर प्रयत्न सुरु आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने सदर आजाराचा जास्त प्रादूर्भाव होऊ नये या दृष्टीकोनातून एका ठिकाणी जास्त लोक जमा होणार नाहीत, याकरीता योग्य दक्षता घेणेबाबत सुचना निर्गमीत केल्या आहेत.

बार्टी, पुणे मार्फत दि. २९/०२/२०२० रोजी जाहिरात प्रसिध्द करुन बँक, रेल्वे, एल.आय.सी. इत्यादी लिपीक वर्गीय व तत्सम पदाच्या स्पर्धा परिक्षेच्या पूर्वतयारी करिता अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून नि:शुल्क अनिवासी प्रशिक्षण (कोचिंग) कार्यक्रमाकरीता अर्ज मागविण्यात आलेले होते व त्यानुसार जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे अर्ज मागविण्याची शेवटची तारीख १९/०३/२०२० ही राहील, मात्र चाळणी परीक्षा दि. २२/०३/२०२० रोजी प्रशिक्षण संस्थांमार्फत घेण्याचे नियोजीत होते. परंतु कोरोना (COVID-१९) या विषाणूंचा प्रादूर्भाव रोखण्याच्या दृष्टीकोनातुन दक्षता म्हणून पुढील आदेशापर्यंत सदरची कार्यवाही स्थगित करण्यात येत आहे. याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**कैलास कणसे** (भापोसे)
**महासंचालक,बार्टी**

**Advt/IBPS/17/03/2020/37**